# कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे संत गाडगेबाबा जयंती साजरी

गाडगे बाबांनी हातात झाडू घेवून किर्तनाचे माध्यमातुन मनातील व गावातील स्वच्छते बद्दल अज्ञान, व्यसनाधिनता, पशुहत्या, हुंडाबळी, समाजातील वाईट प्रवृत्ती अंधश्रदधा घालवून मानसात समाज प्रबोधनाव्दारे आत्मसन्मान निर्माण केला. बालविवाह, हुंडाबळी, या सारख्या वाईट प्रवृत्ती करिता समाज प्रबोधन किर्तनाचे माध्यमातुन स्वच्छ करणारे संत गाडगे बाबा कर्तेसूधारक होते असे प्रतिपादन डॉ. एन. डी. पार्लावार, सहयोगी अधिष्ठाता, व. ना. कृ. जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ यांनी केले.

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे दि. २३ फेब्रुवारी २०२० रोजी संत गाडगे महाराज जयंती मोठया उत्साहाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे सहयोगी अधि ठाता, डॉ. एन. डी. पार्लावार, प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी, डॉ. रविंद्र सातभाई, श्री. मंगेश टे, सहायक कुलसचिव, डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, रूपेश राऊत, यांच्या उपस्थितीत संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

ते पुढे बोलतांना म्हणाले की, संत गाडगे बाबाची साधी राहणी उच्च विचार होते. त्यांनी आठ तास श्रमदान व चौदातास ज्ञानदानाचे कार्य केले. त्यांनी केवळ उपदेशच दिला नाही तर उपेक्षित समाजातील समस्या सोडविण्याचे कार्य केले. ते त्याग आणि वैराग्याचे मुर्तीमंत रूप होते. त्यांनी स्वत:साठी दशसुत्री कार्यक्रम राबविला व नंतर इतरांना उपदेश दिला. एवढेच नव्हे तर त्यांनी अन्नछत्रे, दवाखाने, धर्मशाळा काढून शिक्षणाचे महत्वाचे कार्य घडवून आणले. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेवून पंतप्रधानानी ग्रामस्वच्छतेच्या माध्यमातुन संपूर्ण देशात स्वच्छता अभियान राबविले जात आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण ठेवून जीवनात आपणही समाजासाठी मौल्यवान कार्य करावे, गाडगेबाबांनी दिलेला संदेश प्रत्येक गावात पसरवावा असे आवाहन डॉ. पार्लावार यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन सोनाली शिरस्कर या विद्यार्थीनीने केले. या कार्यक्रमाला एकनाथ भंकाळे, प्रविण डोंगरे, ुभम धार्मिक, महाविद्यालयातील कर्मचारी, तसेच विद्यार्थी उपस्थीत होते.


Dr. PANJABRAO DESHMUKH KRISHI VIDYAPEETH, AKOLA
Vasantrao Naik College of Agricultural Biotechnology,
Yavatmal
Annual Social Gathering
'Mrudang'
Vasantrao Naik College of Agricultural Biotechnology
Yavatmal


Dr. PANJABRAO DESHMUKH KRISHI VIDYAPEETH, AKOLA
Vasantrao Naik College of Agricultural Biotechnology,
Annual Social Gathering